दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## एसटीच्या उत्पन्नात गेल्या ४० वर्षांतील सर्वात मोठी घट

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्य परिवहन (एसटी) महामंडळ आर्थिक गर्तेत अडकली असून, एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध प्रयत्न सुरू केले आहेत. परंतु, एसटीला प्रवासी तिकीटातून मोठ्या प्रमाणावर महसूल मिळत आहे. परंतु, गेल्या दीड महिन्यापासून एसटीच्या महसुलात सातत्याने घट होत आहे. ऑगस्टच्या पहिल्या पाच दिवसांत दैनंदिन उत्पन्नात प्रचंड घट झाली आहे. गेल्या ४० वर्षांतील ही सर्वात मोठी घट आहे. एसटीचा आर्थिक तोटा दिवसेंदिवस वाढत असताना राज्य सरकार आणि एसटी महामंडळ झोपेचे सोंग घेऊन सुस्त बसले आहे, अशी टीका महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केली. एसटीची या वर्षाच्या सुरुवातीला झालेली भाडेवाढ लक्षात घेतली, तर उद्दिष्टाच्या तुलनेत प्रतिदिन साधारण ३२ कोटी ३६ लाख रुपये इतके अपेक्षित उत्पन्न मिळायला हवे होते. परंतु, ऑगस्टच्या पहिल्या पाच दिवसांत प्रत्यक्षात सरासरी २७ कोटी रुपये इतके उत्पन्न मिळत आहे. ऑगस्टच्या पहिल्या पाच दिवसांत एसटीच्या दैनंदिन उत्पन्नातील घट साधारण पाच कोटी झाली आहे. ऑगस्ट महिन्यात एसटीच्या उत्पन्नाचा आलेख घसरला आहे. गेल्या ४० वर्षांतील ही सर्वात मोठी तूट आहे. यावरून एसटीची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस बिकट होत असल्याचे दिसून येत आहे.

(वर्ष ६४ वे अंक २०१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.०९ ऑगस्ट २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# मतांची चोरी करणे हे संविधानाची पायमल्ली

## प्रतिज्ञापत्र मागणाऱ्या निवडणूक आयोगावर राहुल गांधींचा संताप

बंगळुरु दि.८ (वृत्तसंस्था)- काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत. भाजपा निवडणूक आयोगाला हाताशी धरून मतचोरी करत असल्याचे कथित पुरावे देखील राहुल गांधी यांनी सादर केले आहेत. त्यानंतर कर्नाटक निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना पत्राद्वारे उत्तर दिले आहे. तसेच आयोगाने राहुल गांधी यांच्याकडे 'मत चोरी'च्या दाव्यांसंबधी त्यांची स्वाक्षरी असलेले शपथपत्र सादर करण्यास सांगितलं आहे.



राहुल गांधी यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला. कर्नाटकमध्ये आयोजित 'व्होट अधिकार रॅली'ला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले की 'मतांची चोरी करणं संविधानाची पायमल्ली करण्यासारखं आहे. आपल्याला कोणत्याही परिस्थितीत देशाचं संविधान वाचवावं लागेल. आपलं संविधान देशातील प्रत्येक नागरिकाला मतदान करण्याचा अधिकार देतं. परंतु, आता देशातील लोकशाही संस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. संविधानाशी छेडछाड केली जात आहे. संविधानात महात्मा गांधी, पंडित नेहरू व वल्लभभाई पटेल यांचा आवाज आहे. एक दिवस परिस्थिती बदलेल आणि सर्वांना शिक्षा मिळेल.'

दरम्यान, राहुल गांधी निवडणूक आयोगाने केलेल्या मागणीसंदर्भात म्हणाले की 'आयोग माझ्याकडे प्रतिज्ञापत्र मागत आहे. मला त्यांना सांगायचं आहे की मी संसदेत संविधानाची शपथ घेतली आहे. आज भारतातील जनता आम्ही सादर केलेल्या डेटावरून (माहिती) निवडणूक आयोगाला प्रश्न विचारू लागली आहे. हे बघून आयोगाने त्यांचं संकेतस्थळ बंद केलं आहे. निवडणूक आयोगाने राजस्थान व उत्तर प्रदेशमध्ये त्यांचं संकेतस्थळ बंद केलं आहे. कारण त्यांना भीती वाटतेय की आता जनतेने डेटा तपासला तर त्यांची पोल खोल होईल.'

## सर्वोच्च न्यायालयात मतदार चोरीच्या याचिकेत सहभागी व्हा; राहुल गांधींना प्रकाश आंबेडकरांचे आवाहन



पुणे दि.८ (प्रतिनिधी)- वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना मतदार चोरीच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. शुक्रवारी पुण्यात पत्रकार परिषदेत बोलताना आंबेडकर यांनी राहुल गांधींच्या निवडणूक आयोगावरील टीकेचे कौतुक केले.

आंबेडकर म्हणाले, 'निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या निवडणुकीत विविध प्रकारे हेराफेरी करून घोटाळा केला आहे. हा विषय न्यायालयात गेल्याशिवाय याचा अंतिम निकाल लागणार नाही.' त्यांनी सांगितले की वंचित बहुजन आघाडीने नोव्हेंबर २०२४ मध्ये सर्व पक्षांना पत्र लिहून एकत्र येण्याचे आवाहन केले होते.

आंबेडकरांनी माहिती दिली की आरटीआय अंतर्गत निवडणूक आयोगाने सांगितले आहे की त्यांच्याकडे कुठलाही रेकॉर्ड नाही. 'सहा वाजल्यानंतर झालेले मतदान निकालाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. यासाठी एक विशिष्ट पद्धत पाळावी लागते, ती पाळली की नाही हे तपासणे आवश्यक आहे,' असे ते म्हणाले.

राहुल गांधींनी कर्नाटकातील एका मतदारसंघात बोगस मतदारांबाबत केलेल्या टिप्पणीचा उल्लेख करत आंबेडकर म्हणाले, 'काँग्रेस पक्षाने खूप चांगले काम केले आहे. निवडणूक आयोगाने त्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले आहे. आता काँग्रेस नेमकी काय भूमिका घेते हे पाहावे लागेल.'

## महाराष्ट्र, कर्नाटक, बिहारच्या मतदार याद्याच वेबसाइटवरून गायब: जितेंद्र आव्हाड यांचा गंभीर आरोप; चोरी सिद्ध झाल्याचा दावा

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र, कर्नाटक, बिहार या राज्यांच्या मतदार याद्या वेबसाइटवरून गायब झाल्या आहेत किंवा या वेबसाईट पर्यंत आता पोहोचताच येत नाही. असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. मात्र आता चोरी सिद्ध झाली असल्याचा दावा देखील त्यांनी केला. चोराने कितीही लपवालपवी केली तरी आता काही फरक पडणार नाही, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

या संदर्भात आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एका सोशल मीडियाच्या पोस्टच्या माध्यमातून निवडणूक आयोगावर टीका केली आहे. चोर चोरीला लपवण्यासाठी धावपळ करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. राहुल गांधी यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेनंतर लोकांची उत्सुकता वाढली आहे. त्यामुळे त्या याद्या वेबसाइटवरून गायब करून टाकल्या असल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे. चोराने चोरी केली आहे, हे आता पुराव्यानिशी सिद्ध केले असल्याचे देखील ते म्हणाले.

## मोदींची पुतिन यांच्याशी चर्चा व भारतभेटीचे निमंत्रण

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- रशियाकडून तेल खरेदी करत असल्याच्या मुद्द्यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क लादले आहे. यादरम्यान भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी फोनवरून संवाद साधला. या दोन्ही नेत्यांमध्ये महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली, याबरोबरच मोदींनी पुतिन यांना भारत भेटीचे आमंत्रण देखील दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली आहे. 'माझे मित्र राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी खूप चांगला आणि विस्तृत संवाद झाला. युक्रेनसंबंधी ताज्या घडामोडींबद्दल माहिती दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानले. याबरोबरच आम्ही आपसातील द्विपक्षीय अजेंड्याच्या प्रगतीचा आढावा देखील घेतला आणि भारत-रशिया ही खास आणि विशेष धोरणात्मक भागीदारी आणखी (पान ४ वर)

## निवडणूक आयोगावर टीका केल्यास फडणवीस का उत्तर देतात?; ते त्यांचे दलाल आहेत का?-हर्षवर्धन सपकाळ

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- निवडणूक आयोगाला विचारलेल्या प्रत्येक प्रश्नावर भारतीय जनता पक्ष का तुटून पडतो? त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न ते का करतात? अशा शब्दात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भारतीय जनता पक्षावर टीका केली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निवडणूक आयोगाचे दलाल आहेत का? निवडणूक आयोगाचे ते वकील आहेत का? असा आमचा प्रश्न आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीवर आमचा आक्षेप आहे. मग त्या आकडेवारी संदर्भात निवडणूक आयोगाला उत्तर का देऊ देत नाहीत. भाजप कशाला घाबरतोय? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

या विषयी सपकाळ यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून भाजपवर निशाणा साधला. ज्या-ज्या वेळी राहुल गांधी निवडणूक आयोगाच्या कामकाजासंदर्भात आक्षेप आणि तथ्य समोर आणतात. त्या-त्या वेळी निवडणूक आयोगाची वकिली करण्याकरता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे समोर येतात. आमचा प्रश्न निवडणूक आयोगाला असतो. त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह असते. मात्र त्याचे उत्तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि देशाचे गृहमंत्री देतात. निवडणूक आयोगाला प्रश्न विचारला तर मुख्यमंत्र्यांना तेथे नाक खुपसण्याची काय गरज? निवडणूक आयोगाची बाजू घेण्याची काय गरज? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आरोपाची चौकशी करू, असे वक्तव्य त्यांनी केले असते तर हरकत नसते. मात्र, ते ज्या अविर्भावात ते बोलत आहेत, त्यावरून स्पष्ट आहे की, 'दाल में कुछ काला है' असे देखील सपकाळ यांनी म्हटले आहे. बिहारमधील मतदार यादीत भारतीय जनता पक्षाची दलाली समोर आली आहे. हा लढा आम्ही बिहारमध्ये देखील लढणार आहोत. या लढ्याला आम्ही कुठे खंड पडू देणार नाही. त्यामुळेच महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश कमिटी या संदर्भात निदर्शने करत आहे. या प्रकरणावर आम्ही रस्त्यावर उतरण्याची भूमिका घेतलेली असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

## ट्रम्प यांच्या टॅरिफ बॉम्बनंतर अमेझॉन, वॉलमार्टने व्यवहार रोखले

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- अमेरिकेने भारतावर २५ टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लागू केलं आहे. तसेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा केली आहे की २८ ऑगस्टपासून आणखी २५ टक्के मिळून ५० टक्के आयात शुल्क लावलं जाईल. ट्रम्प यांनी भारताविरोधात फोडलेल्या या टॅरिफ बॉम्बचे जागतिक बाजारात परिणाम दिसू लागले आहेत. ट्रम्प यांनी टॅरिफ लादल्यानंतर वॉलमार्ट, अमेझॉन, टार्गेट व गॅप यांसारख्या प्रमुख अमेरिकन किरकोळ विक्रेत्या कंपन्यांनी भारतातील त्यांच्या ऑर्डर्स रोखल्या आहेत. भारतीय निर्यातदारांना ज्या गोष्टीची काळजी सतावत होती तेच आता घडू लागलं आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ बॉम्बनंतर अमेरिकेतील कंपन्या भारतीय वस्तूंच्या आयातीबाबात काय निर्णय घेणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. भारतीय निर्यातदारांना काळजी वाटत होती की टॅरिफमध्ये वाढ झाल्यास त्यांच्या ऑर्डर्सवर परिणाम होऊ शकतो आणि आता नेमकं तसंच घडत आहे. एनडीटीव्हीने सूत्रांच्या हवाल्याने दावा केला आहे की भारतीय निर्यातदारांना अमेरिकन खरेदीदारांनी पत्रे व ई-मेल पाठवले आहेत. ज्यामध्ये त्यांनी पुढील सूचना मिळेपर्यंत टेक्स्टाइल्स (कापड) शिपमेंट थांबवण्याची विनंती केली आहे.

## मतदार यादीत प्रॉब्लेम आहे, आम्हालाही मान्य; फडणवीसांचे विधान



मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत. भाजपा निवडणूक आयोगाला हाताशी धरून मतचोरी करत असल्याचे कथित पुरावे देखील राहुल गांधी यांनी सादर केले आहेत. यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. यावेळी त्यांनी राहुल गांधी हे कपोकल्पित गोष्टी सांगत असल्याचे म्हटले आहे.

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोग आणि मतदार याद्यांवर घेतलेल्या संशयाच्या मुद्द्यावर बोलातना फडणवीस म्हणाले की, 'मला असं वाटतं की अलिकडच्या काळात राहुल गांधी यांनी सलीम-जावेद यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडून एक स्क्रिप्ट लिहून घेतली आहे. अतिशय मनोरंजनात्मक अशा प्रकारची स्क्रिप्ट आहे, जी ते सगळीकडे मांडत आहेत. याच्याने मनोरंजनापलीकडे काहीच होत नाही. एकही गोष्ट त्यांच्याकडे तथ्यात्मक नाही, सगळ्या गोष्टी कपोकल्पित मांडल्या जात आहेत.'

'एकीकडे ते म्हणतात की मतदार (पान ४ वर)

## प्रज्वल खेवलकरांच्या मोबाईलमध्ये काय हे फक्त न्यायालयातच उघड होणं आवश्यक-सुप्रिया सुळे

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्य महिला आयोगाचे अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकरच्या मोबाईलमध्ये अश्लील व्हिडिओ सापडल्याचा दावा केला आहे. त्यामुळे एकनाथ खडसे यांच्या जावयाच्या अडचणी वाढल्याची चर्चा आहे. दरम्यान, या संदर्भात आता खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सुप्रिया सुळे यांनी रूपाली चाकणकर यांनी केलेल्या दाव्यांवर बोलताना सांगितले की, रोहिणी ताई खडसे या आमच्या पक्षामध्ये आहेत. मात्र, त्यांच्या नवऱ्याचा आमच्या पक्षाशी कोणताही संबंध नाही. मी कोणाच्याही आयुष्यात बोलत नाही. माझी पातळी सोडून मी कधीही बोलत नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. त्यामुळे माझा या प्रकरणाशी काही संबंध नसल्याचे त्या म्हणाल्या.

सुप्रिया सुळे (पान ४वर)

## राज्यात मराठा-ओबीसी दंगली घडल्यास देवेंद्र फडणवीसच जबाबदार-मनोज जरांगे

सातारा दि.८ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक आणि मराठा आरक्षणाचा लढा देणारे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात आता पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठीचा लढा उभारला जाणार आहे. त्यासाठी, मुंबईत २९ ऑगस्टला राज्यभरातून मराठा बांधवांना येण्याचं आवाहनही मनोज जरांगे यांनी केलं आहे. येत्या, २९ ऑगस्ट रोजी आरक्षणाचा तुकडा पाडणार, आरक्षण घेणार ते पण ओबीसीतूनच. राज्यात मराठा आणि ओबीसी समाजामध्ये दंगल घडली तर त्याला जबाबदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील, अशा शब्दात जरांगे पाटलांनी राज्य सरकारला आणि मुख्यमंत्र्यांना इशारा दिला आहे. देवेंद्र फडणवीस हे ओबीसींसाठी लढणार असतील, तर ते मराठ्यांसाठी लढणार नाहीत असाच त्याचा अर्थ होतो, असेही जरांगेंनी म्हटले. मराठा समाजाच्या माध्यमातून २९ ऑगस्टला मुंबई चलो चा नारा देण्यात आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील हे पश्चिम महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यात आज मराठा समाजातील बांधवांना भेटण्यासाठी आणि बैठकीसाठी ते उपस्थित राहिले. त्यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली. देवेंद्र फडणवीस मराठा आणि ओबीसी समाजामध्ये वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकार २९ ऑगस्टला मराठा आरक्षण कसे देत नाहीत, तेच मी पाहतो. मराठा समाजाला ओबीसी समाजामधून आरक्षण घेणार आणि २९ तारखेला आरक्षणाचा तुकडा पाडणार, असे जरांगे पाटील यांनी बोलताना म्हटले.

## कर्जमाफी आणि हमीभावासाठी राज्यव्यापी आंदोलन; राजू शेट्टींचा सरकारला इशारा

पुणे दि.८ (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, हमीभाव आणि इतर मागण्यांसाठी येत्या काळात राज्यव्यापी आंदोलन तीव्र करण्याचा इशारा माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिला आहे. शुक्रवारी पुण्यातील पत्रकार भवनात 'शेतकऱ्यांचे हक्क, संरक्षण व सशक्तीकरण' या विषयावर शेतकरी हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, अखिल भारतीय किसानसभेचे राष्ट्रीय सहसचिव अजित नवले, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे आमदार कैलास पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यासह अनेक शेतकरी नेते उपस्थित होते. राजू शेट्टी यांनी शेतकरी चळवळीच्या हितासाठी सर्व संघटनांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले, 'शेतकरी राजकीय सदोष धोरणनीतीचा बळी ठरत आहे. आंतरराष्ट्रीय दादागिरी केंद्र सरकारने मान्य करू नये.' त्यांनी विदेशी मका, सोयाबीन आणि दुग्धजन्य पदार्थांच्या आयातीला विरोध करण्याचे आवाहन केले. शेट्टी यांनी जीएसटीमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढल्याचे सांगितले. त्यांच्या मते, नैसर्गिक आपत्तीप्रसंगी विम्याचे संरक्षण नसल्याने पायाभूत सुविधांच्या समस्या अनुत्तरित आहेत. सरकारी धोरणांमुळे फक्त बँका, विमा कंपन्या आणि खत-कीटकनाशक कंपन्या मालामाल झाल्या आहेत.

## राहुल गांधींच्या बैठकीत उद्धव ठाकरेंना मागच्या रांगेत स्थान; शिंदेच्या शिवसेनेची टीका

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी उद्धव ठाकरे हे सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिलेल्या निमंत्रणावरून त्यांच्या घरी स्नेहभोजनासाठी देखील ते गेले होते. मात्र यावेळी झालेल्या बैठकीदरम्यान उद्धव ठाकरे यांना सर्वात मागच्या रांगेत बसवण्यात आले होते. त्याचे फोटो सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. या फोटोवरून एकनाथ शिंदे यांच्या नेत्यांनी ठाकरे गटावर टीका केली आहे.

अरे काय तुमची किंमत? असा प्रश्न शिवसेनेच्या नेत्यांनी विचारला आहे. थोडा जरी स्वाभिमान, आत्मसन्मान शिल्लक असेल तर जरा तरी पेटून उठा? असे आवाहन नरेश म्हस्के यांनी केले आहे. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसैनिकांनी बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळावर जात 'उद्धव ठाकरेंना माफ करा, सडका मेंदू साफ करा' अशा घोषणा दिल्या. काँग्रेससोबत जाऊन उद्धव ठाकरे स्वतःचीच अवहेलना करून घेत असल्यामुळे त्यांनी बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर येऊन त्यांची माफी मागावी, अशी भूमिका शिंदे गटाने घेतली आहे.

या संदर्भात एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नेते आणि ठाणे लोकसभा मतदारसंघातील खासदार नरेश म्हस्के यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचे या बैठकीमधील फोटो देखील नरेश म्हस्के यांनी शेअर केले आहेत. यामध्ये त्यांनी हा महाराष्ट्राचा अपमान असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्राची लाज तुम्ही दिल्लीत जाऊन घालवली, अशा शब्दात नरेश म्हस्के यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. बाळासाहेबांनी आम्हाला आत्मसन्मान, स्वाभिमान शिकवला. अपमान विरुद्ध पेटून उठवण्याचा धडा आम्हाला शिवरायांनी आणि बाळासाहेबांनी दिला. तुम्ही यातले काहीच घेतले नाही का? असा प्रति प्रश्न देखील नरेश मस्के यांनी विचारला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया देतांना म्हटले की, उद्धव ठाकरे आमच्याकडे तर ते नेहमी पहिल्या रांगेत राहिले. आमच्याकडे आमच्यापेक्षाही पहिले ते राहिले. त्यामुळे तिथे त्यांचा काय मान-सन्मान आहे, तो आपल्या लक्षातच आलेला आहे. भाषणात खूप म्हणायचं दिल्लीसमोर मान झुकणार नाही. दिल्लीसमोर आम्ही पायघड्या टाकणार नाही आणि आता दिल्लीत काय परिस्थिती आहेष्ठ ते सत्तेत नसताना काय परिस्थिती आहे, हे बघीतल्यानंतर थोडं दुःख होतं, पण ठिक आहे.'

## सत्ताधाऱ्यांच्या टीकेनंतर संजय राऊतांचे प्रत्युत्तर

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राहुल गांधी यांच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांना मागच्या रांगेत बसवले म्हणत सत्ताधाऱ्यांनी टीकेची झोड उठवल्यानंतर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रयुत्तर दिले आहे.

मागे बसल्याची टीका करणारे लोक फालतू आहेत. समोर स्क्रीनवर काही प्रेझेंटेशन होत होते. उद्धवजींना पुढे बसवले होते. पण, त्यांचे म्हणणे पडले की स्क्रीनच्या समोर बसून पाहताना त्रास होतो किंवा नीट दिसत नाही. त्यामुळे आम्ही सर्वच पाठीमागे गेलो. हे भाजपचे आयटी सेलवाले फालतू लोक आहेत. त्यांना समजायला हवे. उद्धव ठाकरेंचे अजून पण फोटो आहेत, ते तुम्ही पाहिले नाहीत का? उद्धव ठाकरे, रश्मी वहिनी, आदित्य ठाकरे यांना राहुल गांधी, सोनिया गांधी आणि प्रियांका गांधी यांनी त्यांचा नवीन घर संपूर्ण दाखवलं. त्या ठिकाणी प्रेझेंटेशन सुरू होते. मी स्वतः तिथे होतो. कमल हसन होते. शरद पवार देखील आमच्या सोबत बसले होते. प्रमुख नेत्यांना पुढे बसवले होते. पण, उद्धव ठाकरे म्हणाले इथून दिसणार नाही. त्यामुळे ते मागे आले होते, असे संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे.

# क्रांती दिनाचे प्रसंग

९ ऑगस्ट,१९४२ हा भारतीय इतिहासातील स्वर्निम दिन होय.या दिनालाच ऑगस्ट क्रांती दिन संबोधतात.१९४२ या ऑगस्ट क्रांती दिनाचे जन्मदाते राष्ट्रपिता महात्मा गांधी होते.२६एप्रिल,१९४२रोजी महात्मा गांधी यांनी इंग्रज सरकारला ठणकावून सांगितले की,' इंग्रज सरकार भारताचे रक्षण करण्यास व नागरिकांना सोयी सुविधा पुरविण्यास असमर्थ आहे, म्हणून त्यांनी देश सोडून चालते व्हावे. इंग्रजांची कर्तृत्वहिनता, ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर यांच्या खालावलेल्या स्थिती व त्यांच्या अन्याय व अत्याचारावरून उघडी पडली आहे, इंग्रजांनी भारत सोडणे हे त्यांच्या दृष्टीने उचित ठरेल' गांधीजीच्या 'भारत छोडो' या घोषणेमुळे भारताचे नागरिक, विशेषतः तरुण प्रभावित झाले. भारत छोडो ठराव ८ऑगस्ट,१९४२रोजी पास करण्यात आला, त्यानंतर अवघ्या काही तासात इंग्रज सरकारने भारत स्थानबद्धता कायद्यानुसार भारतीय नेत्यांची धरपकड

सुरू केली.काँग्रेस कमिटीच्या सर्व नेत्यांना अटक करण्यात आली. अरुणाआसफली यानी स्वतःला आंदोलनात झोकून दिले.सकाळ ९ऑगस्ट ,१९४२दिन उगवला. या दिवशी सकाळी गवालीया टँक मैदानावर अरुणा आसफअली यांच्या हस्ते भारतीय तिरंगा ध्वज फडकविण्यात येऊन ध्वजवंदन करण्यात आले.इंग्रज सरकारची धरपकड सुरूच होती. बिहार,उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बंगाल या ठिकाणी प्रचंड प्रमाणात मिरवणुका काढण्यात आल्या.सरकारी कचेऱ्यांवर हमले झाले,तेथील युनियन जॅक उतरवून भारतीय तिरंगा ध्वज फडकविण्यात आले.सर्व भारतीय संघटित झाले. त्यांनी देश स्वातंत्र्यसाठी भूमिगत आंदोलने सुरू केली.भारतीय तरुण राष्ट्रनिष्ठेने पेटून उठले इंग्रज सरकारला सळो की पळो करून सोडले.ऑगस्ट क्रांती दिनाने संपूर्ण देशातील चित्र पालटले.व क्रांतीकारकांची एक मोठी फळी तयार झाली. प्रखर देशभक्ती ,व देश स्वातंत्र्य भावना देशवासियात जागृत झाली तो दिन म्हणजे ९ऑगस्ट,१९४२होय. संपूर्ण

देशवासीयात स्वतंत्र भारताची ज्योत पेटविणार दिन क्रांती दिन या निमित्ताने तत्कालीन स्वातंत्र्य वीरांना मनापासून मनापर्यंत मानवंदना.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# 'चले जाव' घोषणांनी ब्रिटीशशाही थरकापला : ऑगस्ट क्रांती दिन

**आत्मक्लेश** करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. 'क्रांतीकारी' याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते. या ऐतिहासिक 'चले जाव' आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर 'वंदे मातरम्' हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले. यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदायासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे फार मोठे धाडस होते. या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट ॲटली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट ॲटली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले. इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर ॲटली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४७ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय.

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन 'चले




जाव चळवळ' होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह काँगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती. या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते. त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८ रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना 'चले जाव'चा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली. तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आन्दोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते. सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.

त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला. ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला. भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो.

भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८३ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

**– प्रविण बागडे**

# ९ ऑगस्ट क्रांती मैदानाचे ऐतिहासिक महत्त्व

९ ऑगस्ट हा 'ऑगस्ट क्रांती दिन' म्हणून साजरा केला जातो. मुंबईत असलेल्या ऑगस्ट क्रांती मैदानाचं ऐतिहासिक महत्त्व आहे. येथूनच महात्मा गांधींनी 'भारत छोडो' आंदोलनाची हाक देशवासीयांना दिली होती. या मैदानातून सुरू झालेल्या चळवळीमुळं ब्रिटिशांना देशातून आपली सत्ता सोडावी लागली होती.

९ ऑगस्ट हा 'ऑगस्ट क्रांती दिन' म्हणून साजरा केला जातो. ८ ऑगस्ट १९४२ महात्मा गांधींनी 'भारत छोडो' आंदोलनाची हाक दिली होती. त्यानंतर ९ ऑगस्ट हा दिवस 'क्रांती दिन' म्हणून पाळण्यात आला. या आंदोलनाने ब्रिटीश साम्राज्याला हादरा बसला होता. ऑगस्टमध्ये हे आंदोलन सुरू झाल्यानं त्याला 'ऑगस्ट चळवळ' किंवा 'ऑगस्ट क्रांती' असंही म्हटलं जातं. भारतातील ब्रिटिश शासन संपवण्यासाठी ही चळवळ सुरू करण्यात आली होती.

मुंबईतील 'गोवालिया टँक' मैदान : ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या 'गोवालिया टँक' येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीचे महाअधिवेशन भरले होते. या अधिवेशनात महात्मा गांधी यांनी 'छोडो भारत' आंदोलनाची हाक दिली होती. या आंदोलनातून ब्रिटिशांना भारत सोडून जाण्याचा इशारा देण्यात आला होता. या आंदोलनाची सुरुवात मुंबईतील 'गोवालीया टँक' म्हणजे आजच्या 'ऑगस्ट क्रांती मैदाना'तून झाली. त्यानंतर या आंदोलनाचा भडका संपूर्ण देशभरात पसरला होता. या आंदोलनादरम्यान, महात्मा गांधींनी भारतीयांना 'करेंगे या मरेंगे' असा नारा दिला होता. या चळवळीदरम्यान देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी हजारो हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता आहुती दिली. अशा अमर हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहून आजचा दिवस साजरा केला जातो.

सविनय कायदेभंग चळवळ : ८ ऑगस्ट १९४२ रोजी बॉम्बे अधिवेशनाने भारत छोडो आंदोलनाची पायाभरणी केली. भारत छोडो आंदोलन ऑगस्टमध्ये सुरू झाले, म्हणूनच याला 'ऑगस्ट आंदोलन' असंही म्हणतात. भारतातील ब्रिटीश राजवट संपवण्यासाठी सुरू केलेली ही सविनय कायदेभंग चळवळ होती. गांधीजींनी आपल्या भाषणात देशाला 'करो किंवा मरो' असं आवाहन केलं होतं. ही चळवळ ९ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू झाली. यानंतर इंग्रजांनी सूडबुद्धीनं महात्मा गांधींसह सर्व प्रमुख नेत्यांना अटक केली.

# मिरवणूक, सत्कार व विविध कार्यक्रमांनी भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव साजरा





छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – स्वकुळ साळी समाजाचे आराध्य दैवत व आद्य वस्त्रनिर्माते भगवान जिव्हेश्वर महाराजांचा जन्मोत्सव ७ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा झाला. एन-८ परिसरातील श्री जिव्हेश्वर मंदिरात पारंपरिक पद्धतीने आणि धार्मिक वातावरणात झालेल्या या सोहळ्याला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सकाळी ६ वाजता भगवान जिव्हेश्वरांच्या पाळण्यातून आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दिवसभर विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल होती. यावेळी एसआरपीएफ कॅम्पचे कमांडर विक्रम साळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

व्यासपीठावर ट्रस्ट अध्यक्ष संतोष लोंढे, पतसंस्था अध्यक्ष अशोक राजकडे, कैलास धावणे, स्वाती लंगोटे, दत्ता वऱ्हाडे, शाम कांबळे, संजय सरोदे, नीलिमा लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळी ९ वाजता भगवान जिव्हेश्वर महाराजांची प्रतिमा व माहात्म्य ग्रंथ रथात ठेवून मिरवणूक काढण्यात आली.

ही मिरवणूक मंदिरापासून अधीक्षक कार्यालय, टीव्ही सेंटर मार्गे परत मंदिरात आली. मिरवणुकीदरम्यान 'जय जिव्हेश्वर'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. वाटप केंद्रांवर पाणी व दूध वाटपाची सोय करण्यात आली होती. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, विविध गुणदर्शन कार्यक्रम, खेळांतील विजेत्यांना बक्षिसे वाटप व वर्षभर समाजहितासाठी कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावर्षीचा महाप्रसाद सर्व मुंदाणकर बंधूंनी दिला.

**१६व्या वर्षी पारायण परंपरा जपली –** जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला एकदिवसीय श्री जिव्हेश्वर विजय ग्रंथ पारायण सोहळा पार पडला. यंदाचे हे सलग १६वे वर्ष होते. प्रमुख पठणकर्ते म्हणून कैलास धावणे व स्वाती लंगोटे होते. एकूण ३२ सदस्यांनी पारायणात सहभाग घेतला. या सोहळ्याचे आयोजन अश्विनी राजकडे व नवनाथ चोटमल यांनी केले.

## खळबळजनक! कपिल शर्माच्या कॅफेवर महिनाभरात दुसऱ्यांदा गोळीबार; कुख्यात गँगस्टरने स्वीकारली हल्ल्याची जबाबदारी

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – कॉमेडियन कपिल शर्माने ४ जुलै रोजी कॅनडामध्ये Kap's Cafe नावाचा नवीन कॅफे सुरू केला होता. कपिलच्या मालकीच्या या कॅफेवर महिनाभरात दुसऱ्यांदा गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. 'कॅप्स कॅफे'चे उद्घाटन झाल्यानंतर जुलै महिन्याच्या सुरुवातील या इमारतीवर काही अज्ञातांनी गोळीबार केला आहे. आता पुन्हा एकदा गुरुवारी, ७ ऑगस्ट रोजी अशी घटना घडल्याचे वृत्त समोर आले आहे. ब्रिटिश कोलंबियामधील सरे या ठिकाणी असणाऱ्या एका इमारतीमध्ये हा कॅफे आहे.

**महिनाभरात दुसऱ्यांदा गोळीबाराची घटना**

दरम्यान कपिल शर्माच्या कॅनडामधील कॅफेवर दुसऱ्यांदा गोळीबार झाला. 'इंडिया टुडे'ने याविषयी वृत्त दिले आहे. अवघ्या महिनाभराच्या कालावधीमध्ये याठिकाणी गोळीबाराची ही दुसरी घटना घडली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, एका सोशल मीडिया पोस्टद्वारे गँगस्टर गोल्डी ढिल्लोंने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, गोल्डी हा लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचा दावा त्याने केला आहे. हल्ल्याची जबाबदारी स्वीकारण्यासंदर्भात समोर आलेल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये याविषयी नमूद करण्यात आले आहे. ही पोस्ट अशी आहे की, 'जय श्री राम. सतब श्री अकाल, सर्व भावांना राम राम! कपिल शर्माच्या कॅप्स कॅफे, सरे याठिकाणी आज झालेल्या गोळीबाराची जबाबदारी गोल्डी ढिल्लों आणि लॉरेन्स बिश्नोई टोळीने घेतली आहे. आम्ही त्याला फोन केला होता, त्याने रिंग ऐकली नाही म्हणून आम्हाला कारवाई करावी लागली. जर त्याला अजूनही रिंग ऐकू आली नाही तर आम्ही लवकरच मुंबईत पुढील कारवाई करू.' कॉमेडियन कपिल शर्मा आणि त्याच्या पत्नी गिन्नी चतरथ यांनी अगदी काहीच दिवसांपूर्वी हा कॅफे सुरू केला होता. जुलै महिन्याच्या सुरुनातीला गोळीबार झाल्यानंतर, काही दिवसांनी पुन्हा एकदा हा कॅफे ग्राहकांसाठी सुरू करण्यात आला. आता महिनाभरात दुसऱ्यांदा गोळीबाराची घटना घडल्याने परिसरात दहशतीचे वातावरण आहे. अद्याप याप्रकरणी कपिल, गिन्नी किंवा कॅफेच्या टीम कडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

# स्वच्छ सुंदर बस स्थानक अंतर्गत अमरावती विभागामार्फत वैजापूर स्थानकाची स्वच्छता तपासणी



वैजापूर, दि. ८ (प्रतिनिधी) – स्वच्छ व सुंदर बसस्थानक सर्वेक्षण -२०२५अंतर्गत वैजापूर बस स्थानकाची सर्वांगीण तपासणी शुक्रवार(ता,०८)रोजी अमरावती प्रादेशिक राज्य मार्ग परिवहन विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक रोहन पलंगे( नियंत्रण--५ ) व याच अमरावती विभागाचे वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी राकेश पवार यांनी शहरातील जेष्ठ समाजसेवक व स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत व प्रवाशी मित्र हरीश कुमावत यांच्या समवेत बस स्थानक स्वच्छता, ओला -सुका कचरा विलगीकरण, येथील शौचालय स्वच्छता, प्रवाशी आसन व्यवस्था, डस्ट बिन व्यवस्था ,बसेस वेळापत्रक या सर्व बाबींची एक तासभर तपासणी केली. समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत व हरीश

कुमावत यांच्याकडून शंभर गुणांची अभिप्राय प्रश्नावली भरून घेतली.बस स्थानक व्यवस्था व स्वच्छता तसेच एकंदरीत व्यवस्थेबाबत रोहन पलंगे यांनी समाधान व्यक्त केले.गत दोन वर्षांपूर्वी वैजापूर बस आगराला व स्थानकाला लाख रुपयांचे बक्षीस मिळालेले आहे.या वर्षी ही कोटीचे बक्षीस ठेवण्यात आलेले आहे. वृक्षारोपण व पार्किंग व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी समिती सदस्य व किरण धनवटे याना दिल्या.आगार प्रमुख किरण धनवटे व स्थानक प्रमुख वरिष्ठ नियंत्रक कृष्णा जाधव यांनी संबंधितांना सविस्तर माहिती सादर केली.याप्रसंगी सहाय्यक वाहतूक अधिकारी एस. के. गरुड, गोपाल पगारे, जनार्दन कोकाटे, कीर्ती जाधव, सचिन राऊत, श्री. ठाकूर, आदिनाथ मुळे, सागर सुरासे, (सेक्युरिटी) यांची उपस्थिती होती.

# नागरी सहकारी बँकांकडून रिझर्व बँकेच्या अपेक्षा

**नागरी** सहकारी बँकांचे आर्थिक क्षेत्रात असलेले महत्त्वाचे स्थान, तळागाळातील लोकांसाठी या बँका करीत असलेले काम याची रिझर्व बँकेने दखल घेतली आहे.

पुणे येथील रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये संचालकांसाठी झालेल्या कार्यक्रमाच्या समारोपात, रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री स्वामीनाथन यांनी केलेल्या भाषणात, नागरी सहकारी बँकांकडून रिझर्व बँकेच्या अपेक्षांबद्दल स्पष्टपणे विचार व्यक्त केले आहेत. हे भाषण रिझर्व बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून सर्व नागरी सहकारी बँकांच्या संचालक मंडळांनी याची गंभीरपणे दखल घेण्याची गरज आहे.

त्यांच्या भाषणाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

१) नागरी सहकारी बँका या नफा कमवण्यासाठी असलेल्या संस्था नसून, तळागाळातील व्यक्तींच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्या प्रयत्न करीत आहेत ,याची रिझर्व बँकेकडे नोंद आहे.

२) नागरी सहकारी बँकांच्या या भूमिकेबद्दल त्यांनी कौतुक व्यक्त केले.

३) या सोबतच नागरी सहकारी बँकांकडून असलेल्या अपेक्षांबाबत त्यांनी स्पष्टपणे आपले विचार मांडले आहेत.

४) नागरी सहकारी बँकांनी पाच मुद्द्यांवर गंभीरपणे लक्ष द्यावे असे त्यांनी प्रतिपादन केले असून हे पाच मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) प्रशासन जबाबदारी मजबूत करणे

ब)अंतर्गत हमीकार्यांवर ,विशेष लक्ष देणे, यात ऑडिट आणि अनुपालन हे महत्त्वाचे.

क) ऑडिटर्स आणि रिझर्व बँकेचे निरीक्षक यांच्याशी अर्थपूर्ण संवाद राखणे.

ड) तंत्रज्ञानाचा जबाबदारीने अवलंब करणे

इ) संस्थात्मक सामूहिक बळकटीसाठी अम्ब्रेला ऑर्गनायझेशन ची मदत घेणे.

या मुद्यांसोबतच नागरी सहकारी बँकांच्या क्षेत्राची शाश्वत प्रगती आतूनच आली पाहिजे यावर त्यांनी भर दिला आहे. नैतिक देखरेख, मजबूत अंतर्गत प्रणाली सुनिश्चित करणे, ही संचालक मंडळाची जबाबदारी आहे हे त्यांनी अधोरेखित केले आहे. पुरेशी तांत्रिक तयारी नसल्यास डिजिटल बँकिंग सेवांचा आग्रह धरू नये असेही त्यांचे मत आहे.

सायबर सुरक्षा ही सर्वस्वी संचालक मंडळाची जबाबदारी आहे, आणि त्यांनी ती काटेकोरपणे अंमलात आणली पाहिजे. ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे हे सांगण्यास ते विसरले नाहीत. त्यांच्या भाषणातील प्रमुख मुद्द्यांचा विचार करता ,संचालक मंडळाने कामकाज करत असताना व्यावसायिक पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.लेखापरीक्षण आणि अनुपालन यावर त्यांचा भर असून यासाठी संचालक मंडळात पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. या विषयातील जाणकार संचालकांनी त्यात लक्ष घालणे अपेक्षित आहे. प्रशासकीय चौकट मजबूत असली पाहिजे. यामध्ये भविष्यातील गरजांचा विचार करून मनुष्यबळ नियोजन करणे अपेक्षित आहे. लेखापरीक्षण ,कर्ज विभाग ,गुंतवणूक आणि सामान्य प्रशासन या विभागांमध्ये कर्मचारी अधिकारी वर्गाची दुसरी फळी तयार करणे हे अत्यंत आवश्यक आहे.

तंत्रज्ञान वापरत असताना पुरेशी तयारी नसल्यास, विशेषतः सुरक्षिततेबाबत पुरेशी तयारी नसल्यास, डिजिटल बँकिंग सेवांचा आग्रह धरू नये, हा रिझर्व बँकेने नागरी सहकारी बँकांना दिलेला अप्रत्यक्ष इशारा आहे.

सायबर सिक्युरिटी ही संचालक मंडळाची अंतिमतः जबाबदारी आहे हे माननीय डेप्युटी गव्हर्नर यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे, यावर संचालक मंडळात पुरेशी चर्चा होणे आणि त्यानुसार अंमलबजावणी होणे हे आवश्यक आहे.

संचालक मंडळाने धोरणात्मक विषयांवर अधिक काम करावे, अनुपलनावर भर द्यावा, या रिझर्व बँकेच्या सूचनांचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे. संचालक मंडळाच्या सभेमध्ये रुटीन विषयांव्यतिरिक्त धोरणात्मक विषयांबाबत वेळ राखून ठेवला जावा. किंवा या प्रकारच्या चर्चेसाठी स्वतंत्रपणे संचालक मंडळाच्या बैठका घेतल्या जाणे आवश्यक आहे. रिझर्व बँक काही बाबतीत मार्गदर्शक तत्वे आखून देते, त्या चौकटीतच काम करणे आवश्यक आहे आणि हे होते की नाही हे पाहण्याची संचालक मंडळावर जबाबदारी आहे.

अम्ब्रेला ऑर्गनायझेशनची अनेक बाबतीत विशेषतः तांत्रिक बाबतीत होऊ शकते ती घेतली पाहिजे. रिझर्व बँक ज्यावेळी आपल्या अपेक्षा व्यक्त करते ,त्याचवेळी हे न झाल्यास दंडात्मक कारवाई होऊ शकते असा अप्रत्यक्ष इशारा यातून स्पष्ट होतो, आणि तसे अनुभवही आहेत.

माननीय डेप्युटी गव्हर्नर यांच्या मूळ भाषणाचा मसुदा ,संचालक मंडळात यानिमित्ताने निश्चितपणे चर्चेसाठी घेण्यात यावा.

हे बँकांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ठरेल असे वाटते. रिझर्व बँक ऑफ इंडिया च्या डेप्युटी गव्हर्नर यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे संचालक मंडळाचे कामकाज होते आहे की नाही हे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासोबत तज्ञ संचालकांनी पाहणे गरजेचे आहे. बोर्ड मॅनेजमेंटने यावर गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.

**– डॉ. अभय मंडलिक**

लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत

## खोट्या बलात्कार प्रकरणात अडकवून मागितली १ कोटींची खंडणी, बँक महिला कर्मचाऱ्याला अटक

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – आयटी प्रोफेशनलला खोट्या बलात्कार प्रकरणात अडकवून १ कोटींची खंडणी मागितल्याची घटना मुंबईतील चारकोपमध्ये घडली आहे. आयटी प्रोफेशनलला खोट्या बलात्कार प्रकरणात अडकवून १ कोटींची खंडणी मागितल्याची घटना मुंबईतील चारकोपमध्ये घडली आहे. याप्रकरणी खंडणी मागणाऱ्या ठइङ बँक महिला कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी सहा आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चारकोप पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

**बँक डेटाचा गैरवापर, ब्लॅकमेलिंग आणि खोट्या गुन्ह्यांचा आरोप –** चारकोप पोलिसांनी मोठी कारवाई करत ठइङ बँकेच्या डॉली कोटक या महिलेला अटक केली आहे. तिने आपल्या माजी जोडीदाराविरुद्ध खोटा बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करुन त्याच्याकडून १ कोटी रुपयांची खंडणी उकळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात एकूण सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# चांगल्या कामातून करा विभागाचे प्रतिमा संवर्धन-विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

## महसूल सप्ताह समारोप : स्वतःचे ज्ञान अद्यावत करुन लोकांना सेवा द्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी








छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- लोकांना सेवा देणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. विभागाचे म्हणून काही विषय आहेत. याबाबत शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय वेळोवेळी होत असतात. हे निर्णय विभागाच्या आणि कर्मचारी अधिकारी यांच्या हिताचेच असतात. आपण चांगले काम करुन लोकांना सेवा द्यावी व आपल्या विभागाचे प्रतिमा संवर्धन करावे,असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना केले.

दैनंदिन कार्यालयीन कामकाज,सेवा, कर्तव्य बजावतांना आपण आपले ज्ञान अद्यावत करत राहणे आवश्यक आहे. अद्यावत ज्ञान केल्यास आपण लोकांना चांगली सेवा देऊ शकतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

महसूल सप्ताहाचा आज समारोप झाला. त्यानिमित्त एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, कुलगुरु डॉ.विलास सपकाळ, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य प्रशासकीय अधिकारी सिडको जगदीश मिणीयार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, संगिता राठोड, संगिता सानप, एकनाथ बंगाळे, डॉ. अरुण जऱ्हाड, संतोष गोरड तसेच सर्व तहसिलदार, कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी अनिल सुर्यवंशी, परेश खोसरे, देविदास जरारे, विद्याचरण कडवकर, स्वरुप कंकाळ आदी उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. सपकाळ यांनी सांगितले की, सेवा काळात वाचन आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालून आपण स्वतःचे ज्ञान अद्यावत करावे. बहुविध पद्धतीची कामगिरी आपणास करणे सहज शक्य होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, आपल्या विभागामुळे आपल्याला ओळख नाव मिळते. प्रतिष्ठा मिळते. ती प्रतिष्ठा लोकांना चांगल्या प्रकारे सेवा देऊन आपण वाढविली पाहिजे. त्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन, वाचन, आरोग्य विषयक जागरुकता राखणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्त पापळकर म्हणाले की, शासनाने आता अनेक विषयात धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. कृत्रिम वाळू धोरण हे अशाच प्रकारचे धोरण आहे. लोकांना स्वस्तात वाळू उपलब्ध करुन दिल्यास हा प्रश्न निकाली निघेल. जगाच्या प्रगतीबरोबर आपल्यालाही जुळवून घ्यावे लागेल. त्यासाठी स्वतःचे ज्ञान अद्यावत ठेवावे. विभागाची प्रतिमा उंचवावी,असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक जनार्दन विधाते यांनी केले.यावेळी महसूल अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. सर्व महसूल कर्मचारी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम; योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही महाराष्ट्र शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींना उद्योग, व्यवसाय क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या संधींचा लाभ मिळवून देण्यासाठी ही योजना राबविली जाते. या योजनेचा होतकरू युवक युवतींनी लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी केले आहे.

**उद्दिष्ट :** पाच वर्षांत एक लाख सूक्ष्म आणि लघु उद्योग स्थापन करून १० लाख रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

**आर्थिक मदत :** ही योजना पात्र व्यक्ती आणि बचत गटांना अनुदान आणि कर्जाद्वारे आर्थिक सहाय्य प्रदान करते.

**पात्रता :** ही योजना सेवा उद्योग ५० लाख व उत्पादन उद्योग १ कोटी रुपयांपर्यंतच्या प्रकल्प खर्चासह ग्रामीण उद्योगांसह सर्व नवीन व्यवहार्य सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी खुली आहे.

**लाभार्थी :** वार्षिक उद्दिष्टांमध्ये अनुक्रमे २०टक्के आणि ३०टकके आरक्षणासह, अनुसूचित जाती/जमाती आणि महिला अर्जदारांवर लक्षणीय लक्ष केंद्रित केले जाते.

**अनुदान मर्यादा :** घटकाच्या प्रवर्गानुसार प्रकल्प किंमतीच्या १५ ते ३५टक्के.

**नकारात्मक उद्योग :** काही उद्योगांना या योजनेतून वगळण्यात आले आहे, जसे की मांस प्रक्रिया, तंबाखूशी संबधित उद्योग व शासनाने निर्बंध घातलेले उद्योग.

**अर्ज प्रक्रिया :** अर्ज अधिकृत CMEGP पोर्टलद्वारे ऑनलाईन सबमिट केले जातात.

**अधिकृत संकेतस्थळ :** www.maha-cmegp.gov.in

ही योजना राबविण्याकरिता किंवा मंजुरी देण्यासाठी किंवा कोणत्याही आर्थिक सहाय्यासाठी कोणत्याही खाजगी पक्ष/एजन्सी/मध्यस्थ/फ्रँचायजी इ. नियुक्त केलेले नाही अशा त्रयस्थ एजन्सीशी व्यवहार केल्यास घडलेल्या परिणामास संभाव्य लाभार्थी/उद्योजक स्वतः जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी, असे आवाहन महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## बेघर निर्वासितांच्या न्यायासाठी 'जन आक्रोश महामोर्चा'

### क्रांती चौकापासून विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत आंबेडकरी संघटनांचा मोर्चा

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरात सुरू असलेल्या बुलडोझर कारवाईविरोधात आणि बेघर झालेल्या नागरिकांच्या न्यायहक्कांसाठी शुक्रवारी ८ ऑगस्ट रोजी 'सर्वपक्षीय जन आक्रोश महामोर्चा' आयोजित करण्यात आला. क्रांती चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून दुपारी १ वाजता हा मोर्चा सुरू झाला. दुपारी ३ वाजता मोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहोचला.

आयोजकांनी सांगितले की, 'अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली प्रशासनाकडून कोणतेही पुनर्वसन न देता गोरगरीब, दलित, बहुजन, कामगार, अल्पसंख्याक व मागासवर्गीय नागरिकांना पावसाळ्याच्या तोंडावर बेघर केले जात आहे. यामुळे हे नागरिक अक्षरशः रस्त्यावर आले आहेत.'

हा मोर्चा कोणत्याही एकट्या संघटनेचा नव्हता. सर्व धर्मीय, सर्व पक्षीय, आंबेडकरवादी, संविधानवादी, समतावादी, मानवतावादी संघटना आणि आंबेडकरी चळवळीच्या पुढाकारातून याचे आयोजन करण्यात आले होते.



मोर्चाचा मार्ग क्रांती चौक, सिल्लेखाना, पैठण गेट, गुल मंडी, सिटी चौक, किल्ले अर्क, व्हिआयपी रोड मार्गे विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत होता. विभागीय आयुक्त कार्यालयासमोर मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. तेथे मनपा आणि लोकप्रतिनिधींविरुद्ध जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

या मोर्चात दिपक निकाळजे, अरविंद कांबळे, दिपक केदार, अमित वाहुळ, जयश्री शिरके, विष्णु जगताप, आनंद कस्तुरे, जयेश अभंग, मनोज जाधव, मिलिंद बनसोडे, विजय शिंगारे, वसंतराज वक्ते, बलराज दाभाडे, सिध्दोधन मोरे, नागेश केदारे, विजय बचके, सचिन जोगदंडे, संतोष चव्हाण, राजकुमार कांबळे आदी कार्यकर्ते व प्रतिनिधी सहभागी झाले होते.

## उत्तरकाशीत अडकलेल्या महाराष्ट्रातील १७१ पर्यटकांशी संपर्क, सर्वजण सुखरूप

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात झालेल्या भीषण भूस्खलन आणि पूरस्थितीमुळे तिथे अडकलेल्या १७१ पर्यटकांशी संपर्क झाला असून ते सर्व सुरक्षित ठिकाणी आहेत. उर्वरित एक पर्यटक कृतिका जैन यांच्याशीही संपर्क साधण्याचे प्रयत्न युध्दपातळीवर सुरु असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (डीडीएमए) आणि संबंधित यंत्रणेने दिली.

महाराष्ट्रातील विविध भागांतील सर्व पर्यटक प्रवासी सुखरूप आहेत. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन हे उत्तराखंडमध्ये काल दाखल झाले असून त्यांनी विविध ठिकाणी अडकलेल्या पर्यटकांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधून शासनाकडून करण्यात येत असलेल्या उपायोजनाची माहिती दिली. परिसरातील रस्ते देखील पूर्ववत सुरू करून त्याद्वारे नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय रस्ते विकास विभाग राज्यमंत्री अजय टम्टा यांचीही महाजन यांनी भेट घेऊन याबाबत त्यांच्याशी संवाद साधला. राज्य शासनाकडून महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत असल्याचे महाजन यांनी सांगितले. उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात अडकलेल्या एकूण १७२ पर्यटकांपैकी १४७ पर्यटक सुखरूप आहेत. त्यापैकी (६७ पर्यटक मातलीत, ६ पर्यटक जॉली ग्रॅन्ट येथे तर ७४ उत्तरकाशी येथे आहेत. सुरक्षित असलेल्या पर्यटकांनी त्याच्या नियोजित कार्यक्रमानुसार पुढील वाटचाल सुरु केली आहे. २५ पर्यटक हर्षील येथे सुरक्षित असून त्यांना एअर लिफ्ट करुन मताली येथील आयटीबीपी कॅम्पमध्ये हलविण्यात येणार आहे. महाराष्ट्राचा राज्य आपत्ती नियंत्रण कक्ष उत्तराखंडच्या आपत्ती नियंत्रण कक्ष, जिल्हा नियंत्रण कक्ष, डीईओसी-उत्तरकाशी, आणि नवी दिल्लीतील राष्ट्रीय आपत्काल ीन प्रतिसाद केंद्राशी सातत्याने संपर्कात आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उत्तराखंड येथे घटनास्थळी शोध व बचावकार्यासाठी दिशानिर्देश देत असून पर्यटकांना सुखरूप स्थळी पोहचविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने त्यासंबंधी उपाययोजना राज्य शासनाकडून राबवल्या जात आहेत.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सर्वेक्षण कशासाठी-प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- महायुती सरकारने निवडणुकीत शेतक-यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते. आज राज्यातील शेतक-यांमध्ये असंतोष आणि नाराजगी आहे. महसूलमंत्री म्हणत आहे कमेटी बनवली ते सर्वेक्षण घेऊन ठरवतील कोणाला कर्जमाफी द्यायची आहे. शरद पवारांनी थेट कर्जमाफीचा निर्णय घेतला होता त्यांनी कोणताही सर्वे केला नव्हता सरसकट कर्जमाफीचा निर्णय जाहिर केला होता. परंतु महायुती सरकारने निवडणुक जिंकण्यासाठी ल ाडल बहिण योजना आणली व जाहीरनाम्यात कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते ते पूर्ण करावे नसता राज्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष रस्त्यावर उतरुन आंदोलन करणार आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची पुर्वतयारी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष व शहराध्यक्ष यांना स्थानिक पातळीचे प्रश्न उपस्थित करुन आंदोलन करावे. नवे व जुने कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्ष संघटना मजबुत करणार आहे. जाणा-यांचा आम्ही विचार करणार नाही जे कठीण काळात सोबत आहे त्यांचाच भविष्यात विचार करु. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका महाविकास आघाडी म्हणून सोबत लढू. तीनही पक्षांची संयुक्त बैठक घेवू. उध्दव ठाकरे व राज ठाकरे एका कारणासाठी एकत्र आले होते त्यांनी अजून युती केली नाही. युती झाल्यानंतर बघू वरिष्ठ नेत्यांसोबत बैठक घेवून त्यावेळी चर्चा करु. निवडणुक चिन्ह आम्हाला पुन्हा मिळेल अशी अपेक्षा आणि चर्चा आहे म्हणून काही नेते पक्षांतर करत आहे त्याचे उदाहरण जालन्याचे काँग्रेसचे नेते कैलास गोरंट्याल भाजपात गेले. कुणकुण लागल्यामुळे राज्यात पक्षांतर सुरु आहे परंतु आम्हाला ठाम विश्वास आहे घड्याळ चिन्ह आम्हाला मिळेल. म्हणून महायुतीत काही अलबेल दिसत नाही. आमदारांची बेचैनी वाढत चालली आहे. असे शिंदे पुढे म्हणाले.

शरद पवार हे भाजपाचे हस्तक आहे काही दिवसांत मोठी बातमी येईल असे वक्तव्य वंचितचे सर्वेसर्वा एड प्रकाश आंबेडकर यांनी वक्तव्य केले होते त्यांना शिंदेंनी प्रत्युत्तर देताना सांगितले गेल्या विधानसभेत त्यांनी महाविकास आघाडीत यावे यासाठी सकारात्मक प्रयत्न केला गेला परंतु त्यांनी अवास्तव अपेक्षा केल्याने शक्य झाले नाही. त्यांनी स्वबळावर निवडणूका लढवल्या त्याचा फायदा मतविभाजन होऊन भाजपाला फायदा झाला. निवडणुका आल्या की चर्चेला वाव देण्यासाठी असले वक्तव्य केले जाते. आम्हालाही अनेक शंका आंबेडकरांबाबत आहे आम्ही काही बोललो नाही त्यांनी त्यांच्या पक्षाचा विचार करावा असा टोला त्यांनी लगावला. यावेळी आमदार रोहीत पवार, माजीमंत्री राजेश टोपे, चंद्रकांत दानवे, जिल्हाध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील, शहराध्यक्ष ख्वाजा शरफोद्दीन, मुश्ताक अहेमद, नवीन ओबेरॉय, महीला शहराध्यक्ष मेराज पटेल, सय्यद तौफीक, मुन्नाभाई, शेख इरफान, मोहंमद ताहेर यांची उपस्थिती होती.

## मनपा मनमानी पद्धतीने नागरिकांच्या मालमत्ता पाडू शकत नाही; विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे मनपा प्रशासनाला खडेबोल

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने शहरात अतिक्रमण विरोधी कारवाई म्हणून अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात येत आहे. मात्र अनेक नागरिकांनी वैध मालमत्ता सुद्धा अतिक्रमण म्हणून महानगरपालिका पाडत आहे. मनपा मनमानी पद्धतीने नागरिकांच्या मालमत्ता पाडू शकत नसल्याचे खडे बोल शिवसेना नेते तथा राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज बैठकीत प्रशासनाला सुनावले. महानगरपालिकेने किती वैध व अवैध मालमत्ता पाडल्या याची नोंद आहे का? शहर विकासासाठी म्हणून पाडलेल्या मालमत्तांना भरपाई कशा प्रकारे देणार असल्याचा जाब दानवे यांनी विचारला. या संदर्भात त्यांनी मनपा अधिकाऱ्यांची बैठक घेत त्यांची कानउघाडणी केली. एमजीएम परिसरात हिंदूहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांचे होत असलेल्या भव्य स्मारक आणि संग्रहाल याची देखील त्यांनी पाहणी केली. स्मारकाचे आणि संग्रहालयाचे प्रलंबित काम तातडीने मार्गी लावण्याची सूचना यावेळी त्यांनी केली. पाणी आणि वादळ यामध्ये तग धरेल अशाप्रकारे मजबूत पुतळा उभारण्यात यावा. शिवसेनाप्रमुखांचा पुतळा कुठे तयार करण्यात येत आहे, याची दानवे यांनी माहिती घेतली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना सदरील स्मारकास मुबलक निधी दिला. मात्र, महायुती सरकारचे शासन आल्यापासून निधीच्या अभावी स्मारकाचे काम प्रलंबित असल्याचा आरोप करत आगामी काळात प्रशासकीय आणि शासन स्तरावर असलेल्या प्रलंबित प्रक्रिया पूर्ण करून काम मार्गी लावण्याची सूचना अंबादास दानवे यांनी केली.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
(आरोग्य विभाग)

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**जाहीर निवेदन**

**किटकजन्य आजार व जलजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शहरात डेंग्यू, चिकनगुन्या, झिका इ. किटकजन्य आजार व गॅस्ट्रो, काविळ, कॉलरा, अतिसार या सारख्या जलजन्य आजाराच्या प्रार्दुभाव टाळण्यासाठी नागरिकांनी खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून महापालिकेस सहकार्य करावे. डेंग्यु चिकनगुन्या व झिका हे विषाणूजन्य (व्हायरल) आजार आहे. हे आजार विशिष्ट प्रकारचा म्हणजे 'एडिस इजिप्टाय 'हा डास चावल्याने होतात 'एडिस इजिप्टाय 'हा डास साठवलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालतो.

**डेंग्यू, चिकनगुन्या व झिका यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना**

* 'एडिस इजिष्टाय 'या डासांची उत्पत्ती स्थाने नष्ट करावी जसे कुलर्समध्ये पाणी, मनीप्लॅटंमधील पाणी, छतावर पडलेले निकामी भांडी, बाटल्या, नारळाच्या करवंट्या, टायर्स, झाकण नसलेल्या टाक्या, हौद इ.
* दर आठवडयातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा. हौद, टाक्यांना नेहमी झाकण लावावे.
* घरातील कुलर्समध्ये पाणी, फुलदाण्यातील, मनीप्लॅटमधील पाणी आठवडयातून कमीत कमी एकदा बदलावे.
* घरातील सांडपाण्यात अबेट (टेमीफॉस) हे डास-अळी प्रतिबंधात्मक औषध टाकून घ्यावे. घरात / परिसरात पाणी साचू देवू नये. साचलेल्या पाण्यात रॉकेल/वाहनातील इंजिनचे जळालेले ऑईल टाकावे. हौदामध्ये गप्पीमासे सोडावी.
* डास प्रतिबंधात्मक मलम, उदबत्त्या, वडया यांचा वापर करावा, अंगभर कपडे घालावे व मच्छरदाणीचा वापर करावा.
* महानगरपालिका तर्फे धूर फवारणी, औषध फवारणी, अबेट टाकणा-या कर्मचा-यांना सहकार्य करावे.

**जलजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना**

* नेहमी शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी वापरावे. (उकळलेले किंवा क्लोरिनयुक्त)
* अन्नपदार्थ नेहमी शिजवून व ताजे खावे, शिळे अन्न खाण्याचे टाळावे, अन्नपदार्थ नेहमी झाकलेले असावे.
* उघडयावरील कापून ठेवलेली फळे, अन्नपदार्थ खाण्याचे टाळावे, जास्त पिकलेली कुजलेली, सडलेली फळे खाण्याचे टाळावे.
* अन्न शिजवण्यापूर्वी, जेवणापूर्वी तसेच शौचास जाऊन आल्यावर साबणाने हात स्वच्छ धुवावेत, उघड्यावर शौचास बसू नये.
* सर्वांनी वैयक्तिक स्वच्छता तसेच घर व परिसर स्वच्छता ठेवावी
* डेंग्यू, चिकुनगुन्या, मलेरिया इ.किटकजन्य आजार व डायरिया, गस्ट्रो, कॉलरा, काविळ, टायफाईड इ. जलजन्य साथीचे आजार हे नोटीफायवल आजार असल्यामुळे रुग्ण आढळल्यास खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी २४ तासाच्या आत मनपा आरोग्य विभागास कळविणे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायदयानुसार बंधनकारक आहे.
* किटकजन्य / जलजन्य आजाराची लक्षणे आढळल्यास रुग्णांनी जवळच्या मनपाच्या आरोग्य केंद्र / रुग्णालय येथे संपर्क साधून उपचार घ्यावे.
* २४ तास साथरोग नियंत्रण कक्ष टोल फ्रि क्र. ८९५६३०६००७ / ७०२०९४९१२१ वर कळवावे.
* e-mail: fwsipamcabd@yahoo.co.in

स्वाक्षरीत/ -
जी. श्रीकांत (भाप्रसे)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

स्वाक्षरीत/ - डॉ.अर्चना राणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी, छ. संभाजीनगर महानगरपालिका

स्वाक्षरीत/ - डॉ.पारस मंडलेचा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, छ. संभाजीनगर महानगरपालिका

स्वाक्षरीत/ - रणजीत पाटील, अति.आयुक्त, छ. संभाजीनगर महानगरपालिका

(पान १ वरुन)

### मोदींची पुतिन यांच्याशी चर्चा व...

दृढ करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या वर्षाच्या अखेरीस अध्यक्ष पुतिन यांचे स्वागत करण्यास मी उत्सुक आहे,' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्सवर करण्यात आलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

याबरोबरच पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना या वर्षाच्या अखेरीस वार्षिक द्विपक्षीय शिखर परिषदेसाठी भारतात येण्याचे आमंत्रण देखील दिले.

### मतदार यादीत प्रॉब्लेम आहे, आम्हालाही...

यादीमध्ये प्रॉब्लेम आहे, आम्हालाही मान्य आहे, आम्ही तर इतके वर्ष सांगतोतष्ठ आमची मागणी होती की कॉम्प्रिहेन्सिव्ह रिविजन करा. आता निवडणूक आयोग म्हणत आहे की कॉम्प्रिहेन्सिव्ह रिविजन करण्यासाठी आम्ही तयार आहोत, त्यांनी बिहारमध्ये सुरू केलं तर राहुल गांधी म्हणतात करू नका. मग त्यांना नेमकं हवं काय आहे? त्यांना कॉम्प्रिहेन्सिव्ह रिविजनही माहिती नाहीये आणि मतदार याद्यांमधील अडचणीही माहिती नाहीत. त्यांना फक्त आपल्या हरण्याकरिता कारण शोधून काढायचं आहे, ते कारण त्यांनी शोधून काढलं आहे,' असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### प्रज्वल खेवलकरांच्या मोबाईलमध्ये काय...

यांनी सांगितले की, आपल्याकडे राईट टू प्रायव्हसी हा कायदा आहे आणि हा कायदा संसद आणि सर्वोच्च न्यायालयाने केला आहे. ज्यावेळी एखाद्या आरोपीचा मोबाईल घेतला जातो तेव्हा तो फक्त पोलिसांकडून कोर्टाल ा दाखवला जातो. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला तो मोबाईल दाखवला जात नाही. त्यामुळे मोबाईलमधील डेटा बाहेर लीक केल्यास तो गुन्हा असल्याचं हे सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डरमध्येच म्हटलं आहे ते मी म्हणत नाही, असं म्हटलं आहे. त्यामुळे आमच्या पक्षातील जे कोणी सदस्य असतील त्यांची जबाबदारी माझीच आहे. त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी आमचीच आहे. मात्र, सदानंद सुळे यांनी काही सरकारमध्ये गडबड केली, तर ती माझी जबाबदारी आहे. मात्र, वैयक्तिक आयुष्यात काय करतात त्याच्याशी पक्षाचा काही संबंध नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे. आम्ही प्रोफेशनल पद्धतीने काम करतो. मात्र मोबाईल कोर्टामध्ये दाखवण्याचा अधिकार फक्त पोलीस यंत्रणेला आहे. त्यामुळे गैरवापर होत असेल तर हे दुर्दैवी असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.